MHNS180010332016

| | |
|---|---|
| दाखल तारीख | २१/०९/२०१६ |
| नोंदणी तारीख | २१/०९/२०१६ |
| निकाल तारीख | २८/०४/२०२६ |
| कालावधी | ०९व. ०७ म.०७दि. |

**कळवण येथील सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कळवण, जि.नाशिक यांचे न्यायालयात,**
**(पिठासीन अधिकारी व्ही.बी.चव्हाण)**

**नि.दि.दा.क्र.७४/२०१६**
**निशाणी क्रमांकः६३**

**श्रीमती. सिताबाई लक्ष्मण गायकवाड**
वयः ४० वर्षे, धंदाः शेती
रा. वेरुळे, ता.कळवण, जि.नाशिक. **वादी.**

**विरुध्द**

१. **श्रीमती. सोनीबाई लक्ष्मण गायकवाड**
वयः ६५ वर्षे, धंदाः शेती,

२. **काशिनाथ रामा गायकवाड,**
वयः ४१ वर्षे, धंदाः शेती,
दोघेही रा. वेरुळे, ता.कळवण, जि.नाशिक **प्रतिवादी.**

**दावाः– ठरावाचे मागणीसाठी व निरंतर ताकिदीचे मागणीसाठी .**

---

**उपस्थितीः–**

श्री.व्ही.एन.जुन्नरे– वादीतर्फे विद्वान विधिज्ञ.
श्री.डी.वाय पाटील – प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञ.

---

**– न्यायनिर्णय–**
**(जाहीर दिनांक २८ एप्रिल २०२६)**

प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द ठरावाचे मागणीसाठी व निरंतर ताकिदीचे मागणीसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादीची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–

मौजे वेरुळे, ता.कळवण, जि.नाशिक येथील शेतजमिन गट नं.१० यांसी क्षेत्र २

हेक्टर ०६ आर अधिक पोटखराबा ०० हेक्टर ०५ आर असे एकुण २ हेक्टर ११ आर यांसी आकार रुपये १.५० पैसे यांसी चतुःसिमा पुर्वेस गट नं.९, पश्चिमेस शिंगाशीची शिव, दक्षिणेस गट नं.४ व उत्तरेस गट नं.११. (सदर मिळकतीस यापुढे दावा मिळकत असे संबोधण्यात आले आहे.)

**३.** सदर वर्णन केलेली दावा मिळकत ही मुळ लक्ष्मण बुधा गायकवाड याचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीतील होती. लक्ष्मण बुधा गायकवाड हे दि.१५.०३.१९७७ रोजी मौजे वेरुळे, ता.कळवण, जि.नाशिक येथे मयत झाले, त्यांचे मृत्यूनंतर रेकॉर्ड ऑफ राईट्सला नोंद नं.२८ झाली. सदर नोंदीप्रमाणे लक्ष्मण यांचे वारस म्हणुन वादी, मुलगी सोमीबाई प्रथम पत्नी व सोनीबाई द्वीतीय पत्नी असे वारस रेकॉर्डला लागले.

**४.** वादीचे पुढे असे म्हणणे की, लक्ष्मण बुधा गायकवाड यांची प्रथम पत्नी सोनीबाई ही दि. २८.११.१९८२ रोजी मयत झाली. तिचे वारस म्हणुन वादी व प्रतिवादी नं.१ यांची नावे रेकॉर्ड ऑफ राईट्सला नोंद नं.१७७ ने दाखल झालेली आहेत. वादीचे वडिल लक्ष्मण बुधा गायकवाड हे दि. १५.०३.१९७७ रोजी मयत झालेनंतर वादी यांची आई प्रतिवादी नं.१ सोनीबाई हिने रामा काळू गायकवाड याचेबरोबर दुसरा विवाह केला. सदरचे विवाहसंबंधातुन दि.१५.०५.१९८० रोजी प्रतिवादी नं.१ हिला काशिराथ रामा गायकवाड म्हणजेच प्रतिवादी नं.२ हा मुलगा झाला. प्रतिवादी नं.१ हिने रामा काळु गायकवाड याचेबरोबर विवाह केल्याने तिचा वादातील मिळकतीमधुन संबंध कायमस्वरुपी संपुष्टात आला. प्रतिवादी नं.१ हिने दुसरा विवाह केल्याने तिचा मिळकतीमधील संबंध संपुष्टात आल्याने वादी ही सदर मिळकतीची एकमेव मालक झालेली आहे, असे असले तरी रेकॉर्ड ऑफ राईट्सला प्रतिवादींचे नाव दाखल असल्याने प्रतिवादी यांनी दि. २२.११.२००३ रोजी दावा मिळकतीबाबत प्रतिवादी नं.२ याचे खोटे व बनावट नाव देवुन वाटप दाखविले व त्या वाटपाप्रमाणे प्रतिवादी नं.२ चे नाव लावुन घेतले. त्याबाबत रेकॉर्डला नोंद नं.२७५ ही झालेली आहे.

५. प्रतिवादी नं.२ याचे नाव रेकॉर्डला दाखल झाल्यानंतर वादी हिने कळवण येथील मे. उपविभागीय अधिकारी, कळवण उपविभाग, कळवण यांचे कोर्टात आरटीएस रिव्हीजन अर्ज नं.३१/२००४ चा दाखल केला, त्याचा निकाल दि.२०.०९.२००४ रोजी लागुन प्रतिवादी नं.१ व २ यांनी केलेले वाटप हे बेकायदेशीर आहे, त्या आधारे केलेली नोंद ही बेकायदेशीर आहे, असे ठरविण्यात आले. त्या निर्णयाविरुध्द सदरील प्रतिवादी नं.१ व २ यांनी नाशिक येथील मे. अॅडी. कलेक्टर साहेब, नाशिक यांचे कोर्टात आरटीएस अपील नं. २४३/२००४ चे दाखल केले. दि.२९.०१.२००७ रोजी प्रतिवादीचे सदरचे अपील फेटाळण्यात येवुन कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय कायम करण्यात आला. त्या निर्णयाविरुध्द प्रतिवादी यांनी मे. अपर आयुक्त साहेब, नाशिक यांचे न्यायालयात आरटीएस रिव्हीजन अर्ज हा नामंजुर करण्यात येवुन दि.०९.११.२०१० रोजी सदरचे रिव्हीजन अर्ज हा नामंजुर करण्यात येवुन दि.२०.०९.२००४ रोजी मे. उपविभागीय अधिकारी, कळवण उपविभाग, कळवण यांनी आरटीएस रिव्हीजन अर्ज नं.३१/२००४ मधील वेरुळे येथील नोंद नं.२७५ ही रद्द करण्याचा निर्णय कायम केला.

६. या दाव्यातील वादी तसेच प्रतिवादी हे हिंदु भिल्ल समाजाचे असुन वर्गीकृत जमातीचे आहेत. त्यांना हिंदु वारसा कायदा लागु नाही. पुर्वीच्या कायद्याप्रमाणे महिलांना मिळकतीमध्ये सिमीत अधिकार प्राप्त झालेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं.१ हिला पतीचे मृत्युनंतर सिमित असे अधिकार प्राप्त झालेले होते. तिने दुसरा विवाह केल्यानंतर ते अधिकारही संपुष्टात आलेले आहेत. आता प्रतिवादी नं.१ हिचा दावा मिळकतीशी काहीएक संबंध राहिलेला नाही. केवळ पतीचे निधनानंतर वारस म्हणुन जे नाव लागलेले होते ते नाव कायम राहिल्याने प्रतिवादी ही दावा मिळकतीमध्ये कब्जामध्ये आहे. तो कब्जा बेकायदेशीर असुन त्या मिळकतीशी प्रतिवादी नं.१ यांचा काहीएक संबंध राहिलेला नाही. मात्र मिळकतीचे अभिलाशापोटी प्रतिवादी नं.२ हया प्रतिवादी नं.१ यांना दुसऱ्या घरातुन झालेल्या मुलाचे

दडपणापोटी प्रतिवादी हे दावा मिळकतीचे कब्जा देणेस नाकारत आहे. सुमारे एक ते दिड महिन्यापुर्वी वादी यांनी प्रतिवादी नं.१ हिला मिळकतीमधील तिचा काहीएक हक्क नसल्यामुळे त्या मिळकतीचा ताबा वादी हिला द्यावा अशी विनंती केली. त्यावेळी प्रतिवादी नं.१ व २ यांनी तिला अडथळे निर्माण केले. कब्जा देण्याचे नाकारले व मिळकत आमची आहे व आम्ही विकुन टाकु कळविले. त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ व २ हे सदरची मिळकत विक्री करण्याचे विचारत असल्याचे खात्रीशीररित्या वादी यांना समजले आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीवरील कब्जा हा बेकायदेशीर आहे व तो कब्जा वादी यांना मिळावा अशा ठरावाचे मागणीसाठी वादी यांचा प्रतिवादी यांचेविरुध्द सदरचा दावा आहे.

७. दावा मिळकतीशी वर वर्णन केल्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ हिचा काहीएक संबंध राहिलेला नाही, अशा परिस्थितीत केवळ रेकॉर्डला नाव दाखल आहे. त्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी नं.१ हया प्रतिवादी नं.२ चे सांगणेवरुन सदर मिळकत ही त्रयस्थ इसमांचे लाभात विक्री करण्याचे विचारात आहेत. तसे झाल्यास बेकायदेशीर मार्गाने मिळकत हस्तांतर होईल व त्यावरील वादी यांचा हक्क कायमस्वरुपी नष्ट होईल. त्यायोगे वादी यांचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान हाईल. त्यामुळे प्रतिवादी नं.१ व २ यांनी दावा मिळकत कोणासही, कोणत्याही मार्गाने तबदील करु नये, अगर तिचेवर कोणत्याही प्रकारे त्रयस्थ इसमांचे व संस्थांचे बोजे निर्माण करु नये असा निरंतर ताकिदीचा हुकुम मिळणेसाठी वादी यांचा प्रतिवादी यांचेविरुध्द प्रस्तुतचा दावा आहे.

८. प्रतिवादी नं. १ व २ यांनी त्यांची कैफियत निशाणी १९ वर दाखल केलेली आहे. त्यामध्ये वादीचा दावा व दाव्यासोबत दिलेला नि.५ चा अर्ज खरा, कायदेशीर व योग्य नाही असे कथन केले आहे. त्यामधील मजकुर प्रतिवादींना मुळीच मान्य नाही. वादी, प्रतिवादी हे हिंदु आदिवासी कोकणा समाजाचे असुन त्यांना हिंदु कायदा लागु नाही. प्रतिवादी नं.१ हिने कधीही दुसरा विवाह केलेला नव्हता व नाही. केवळ महसुल दप्तरी केलेल्या चुकीच्या नोंदीचा

गैरफायदा घेवुन वादीने व तिच्या पतीने मिळकतीच्या अभिलाशापोटी सदरचा दावा मे.कोर्टात दाखल केलेला आहे. महसुल दप्तरी झालेल्या चुकीच्या ६ड फेरफार नोंद नं.२८ व १७७ चा गैरफायदा घेवुन वादीने सदरचा खोटा दावा प्रतिवादींविरुध्द मे.कोर्टात दाखल केला आहे. कै. लक्ष्मण बुधा गायकवाड याचे मृत्यूनंतर प्रतिवादी नं.१ ही शिक्षीत व अडाणी असल्याने सदर वारसाबाबत महसुल अधिकाऱ्यास माहिती देता न आल्यामुळे नोंद नं.१७७ व २८ हया चुकीच्या झालेल्या आहेत. वास्तविक वादी व प्रतिवादी नं.२ हे सख्खे भाऊ बहिण असल्यामुळे वादी व प्रतिवादी हे लक्ष्मण बुधा यांचे मृत्यूनंतर मौजे वेरुळे येथे एकत्र राहत होते. त्यानंतर वादी हिचा विवाह देखील प्रतिवादी नं.१ व २ यांनी श्री. रामदास गणपत बागुल यांच्याशी लावुन दिलेला आहे. वादीचा पती रामदास बागुल यांचेकडे कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता नसल्याने त्यांनी वादीस फुस लावुन सन १९९२ चे सुमारास प्रतिवादी नं.१ हिचेवर अनुचित प्रभाव टाकुन एकत्र कुटूंबाच्या मिळकतीमध्ये वादीने स्वतःचे व तिचे पतीचे नावे वाटप दाखवुन ग.नं.९२/१ व ९२/२ हे त्यांचे नावावर करुन घेतले. ग.नं.१० क्षेत्र हे.२.०६ आर अधिक पो.ख.०.०५ आर ही मिळकत प्रतिवादी नं.१ चे नावावर वाटयाने दिली. सदरचे वाटप हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल नसल्याने वाटपात प्रतिवादी नं.२ याने कोणतीही हरकत घेतली नाही. सन १९९२ साली झालेल्या वाटपाबाबत महसुल दप्तरी फेरफार नोंद नं.१९१ मंजुर करण्यात आली व ती आज तागायत अमलांत आलेली आहे. सन १९९२ साली झालेल्या वाटपापासुन ग.नं.१० ही शेतजमिन प्रतिवादी नं.१ व प्रतिवादी नं.२ यांचे कब्जा वहिवाटीत असुन ते मालकी हक्काने दावा मिळकत वहिती करतात.

९. प्रतिवादी नं.१ व २ यांचे पुढे असे म्हणणे की, प्रतिवादी नं.१ ही वयोवृध्द झाल्याने तसेच तिच्याने शेतीची कामे होत नसल्याने तिने अर्ज, प्रतिज्ञापत्र व जबाब देवुन तिचे नावे असलेली दावा मिळकत ही मुलगा काशीनाथ म्हणजेच प्रतिवादी नं.२ याचे नावे सन २००३ साली वाटपाने करुन दिली. परंतु सदर वाटपात वादी यांनी हरकत घेवुन तसेच महसुल

अधिकारी यांचेशी हातमिळवणी करुन व संगनमत करुन सदरची नोंद रद्द केली आहे. परंतु असे असले तरीही दावा मिळकत आजही प्रतिवादी यांचेच कब्जा वहिवाटीत आहे. वादी ही स्वच्छ हाताने मे.कोर्टासमोर आलेली नाही. वादी व प्रतिवादी नं.२ यांचे वडिल कै.लक्ष्मण बुधा यांच्या अन्य मिळकती म्हणजेच ग.नं. ९२/१ व ९२/२ या मिळकती यापुर्वीच वादीने व तिच्या पतीने वाटपाने त्यांचे नावे करुन घेतल्या आहेत ही बाब त्यांनी मे.कोर्टापासुन लपवुन ठेवली आहे. त्यामुळे वादीचा दावा हा खोटा असुन तो आहे त्या परिस्थितीत चालु शकत नाही. त्यामुळे सर्व कारणांचा विचार होवुन वादीचा दावा व दाव्यासोबत दिलेला निशाणी ५ चा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**१०.** माझे पूर्वपिठासिन अधिकारी यांनी निशाणी २० वर मुद्दे प्रस्थापित केले आहे. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरुन सदर मुद्दंयाचे सकारण निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने हे सिध्द केले आहे काय की, ती सदर दावा मिळकतीची एकमेव मालक आहे ? | **नकारार्थी.** |
| २. | वादीने हे सिध्द केले आहे काय की, प्रतिवादींचा सदर दावा मिळकतीवर बेकायदेशीर ताबा आहे ? | **नकारार्थी.** |
| ३. | वादी ही दावा जमिनीचा ताबा मिळण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी.** |
| ४. | वादी ही मागणी केल्याप्रमाणे निरंतर मनाई हुकुम मिळण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी.** |
| ५. | काय आदेश आणि हुकूमनामा ? | **दावा खर्चासह नामंजुर करण्यात आला.** |

**११.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

## <u>कारणमिमांसा</u>

**१२.** वादीने दिलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | दस्तऐवज | निशाणी |
|---|---|---|
| १. | गट नं. १० चा मुळ ७/१२ उतारा | २३ |
| २. | मुळ ६ड फेरफार नोंद नं.२८ | २४ |
| ३. | मुळ ६ड फेरफार नोंद नं.१७७ | २५ |
| ४. | मुळ ६ड फेरफार नोंद नं.२७५ | २६ |
| ५. | उपविभागीय अधिकारी कळवण यांचेकडील आरटीएस रिव्हीजन नं.३१/२००४ ची सही शिक्क्याची नक्कल | ३० |
| ६. | अप्पर जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडील आरटीएस अपील नं.२४३/२००४ ची सही शिक्क्याची नक्कल | ३१ |
| ७. | अप्पर आयुक्त नाशिक यांचेकडील आरटीएस अपील नं.९३/२००७ ची सही शिक्क्याची नक्कल | ३२ |
| ८. | श्री.काशिनाथ गायकवाड यांच्या नमुना नं.१ ची प्रति मिळणेबाबतच्या अर्जाची छायाप्रत | ३३ |
| ९. | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेरुळे पाडा यांचा जनरल रजिस्टर नमुना १ ची छायाप्रत | ३४ |
| १०. | मौजे अंबापुर ता.कळवण येथील शेतजमिन ग.नं७१ चा ७/१२ उताऱ्याची सही शिक्क्याची नक्कल | ४५ |

**१३. प्रतिवादींनी दिलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा खालीलप्रमाणेः**

| अ.क्र. | दस्तऐवज | निशाणी |
|---|---|---|
| १. | फेरफार नोंद नं.१८१ | ६२ |

**<u>मुद्दा क्र. १ व २ करीताः–</u>**

**१४.** वादीने (वा.सा.क्र.१) तिच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये सदर दावा मिळकत ही मुळ लक्ष्मण बुधा गायकवाड यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीतील होती असे कथन केले आहे. तिने पुढे लक्ष्मण बुधा गायकवाड हे दि.१५.०३.१९७७ रोजी मयत झाल्यावर त्यांचे वारस म्हणुन वादी, मुलगी, प्रथम पत्नी सोमीबाई व द्वीतीय पत्नी सोनीबाई यांची नावे वारस

रेकॉर्डला लागले असल्याचे कथन केले आहे. वादीने अभिलेखावर सदर फेरफार (निशाणी २४) दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता वादी, प्रथम पत्नी सोमीबाई व द्वीतीय पत्नी सोनीबाई यांचे नाव वारस रेकॉर्डला लागल्याचे दिसुन येते. वादीने (वा.सा.क्र.१) तिच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात पुढे लक्ष्मण बुधा गायकवाड यांची प्रथम पत्नी सोमीबाई ही दि.२८.११.१९८२ रोजी मयत झाल्यावर वारस म्हणुन वादी व प्रतिवादी नं.१ यांची नावे फेरफार नोंद नं.१७७ नुसार दाखल झाल्याचे कथन केलेले आहे. वादीने अभिलेखावर सदर फेरफार नोंद नं.१७७ (निशाणी २५) दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी नं.१ यांची नावे दावा मिळकत व गट नं.९२ वर लागल्याचे दिसुन येते.

**१५.** वादीने (वा.सा.क्र.१) तिच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये वादीचे वडिल लक्ष्मण बुधा गायकवाड हे दि.१५.०३.१९७७ रोजी मयत झाल्यावर वादी यांची आई प्रतिवादी नं.१ सोनीबाई हिने रामा काळु गायकवाड यांच्याबरोबर दुसरा विवाह केला व त्या विवाहसंबंधातुन दि. १५.०५.१९८० रोजी प्रतिवादी नं.१ हिला काशिनाथ रामा गायकवाड म्हणजेच प्रतिवादी नं.२ हा मुलगा झाल्याचे कथन केले आहे. वादीने तिच्या पुराव्याला दुजोरा देण्यासाठी येवाजी (वा.सा.क्र.२) यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये मुळ लक्ष्मण बुधा गायकवाड हे सन १९७७ मध्ये मयत झाले, त्यांना सोमीबाई ही एकमेव पत्नी होती व त्या विवाहसंबंधातुन सिताबाई म्हणजेच वादी ही एकमेव मुलगी झाली असे कथन केले आहे. त्यांनी पुढे लक्ष्मण यांना दुसरी पत्नी सोनीबाई ही होती पण त्यांना कोणतेही मुलबाळ झाले नाही. लक्ष्मण मयत झाल्यावर सोनीबाई हिने रामा काळु गायकवाड यांच्याबरोबर विवाह केला होता व त्या विवाहातुन त्यांना काशिनाथ रामा गायकवाड हा मुलगा झाल्याचे त्यांनी कथन केले आहे.

**१६.** वादी (वा.सा.क्र.१) हिने तिच्या उलटतपासादरम्यान लक्ष्मण यांची दुसरी पत्नी सोमीबाई हिने दुसरा घरोबा केला आहे याबद्दल तिला माहिती नसल्याचे मान्य केले आहे. तिने

पुढे प्रतिवादी नं.२ म्हणजेच काशिनाथ याची जन्मतारीख व वर्ष सांगु शकत नसल्याचे कथन केले आहे. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, वादीने दाव्यामध्ये प्रतिवादी नं.२ म्हणजेच काशिनाथ याची जन्मतारीख १५.०५.१९८० अशी नमुद केलेली आहे. त्यामुळे सदर परिस्थितीमध्ये तिने प्रतिवादी नं.२ काशिनाथ याची जन्मतारीख व वर्ष सांगणे आवश्यक होते. परंतु तिने तसे सांगितले नसल्याने काशिनाथ याच्या जन्मतारखेबाबत तिला काहीही माहित नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे तिने दाव्यात काशिनाथ याच्या जन्मतारखेबाबत केलेले कथन हे खोटे असल्याचे दिसुन येते.

**१७.** येवाजी (वा.सा.क्र.२) यांनीदेखील त्यांच्या उलटतपासादरम्यान सोनीबाई म्हणजेच प्रतिवादी नं.१ हिने रामा गायकवाड यांच्यासोबत विवाह केला होता हे दाखविण्यासाठी त्यांच्या शब्दाव्यतिरीक्त इतर कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही हे मान्य केलेले आहे. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, त्यांनी उलटतपासादरम्यान त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र हे त्यांच्यासमक्ष टंकलिखीत करण्यात आलेले नाही असे कथन केलेले असुन त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र वादीने तयार करुन आणले व त्यांनी त्यावर केवळ स्वाक्षरी केली हे देखील मान्य केलेले आहे. सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान मान्य व कबुल केलेली कथने पाहता त्यांना लक्ष्मण व सोनीबाई तसेच काशिनाथ यांच्याबद्दल काहीही माहित नसल्याचे दिसुन येते. त्यांनी केवळ वादीच्या साक्षीला पुरावा देण्यासाठी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे दिसुन येत आहे.

**१८.** वादीने अभिलेखावर मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेरुळे यांनी दिलेला शाळेचा जनरल रजिस्टर नमुना १ ची मुळ प्रत (निशाणी ३४) अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये काशिनाथ याचे संपुर्ण नाव काशिनाथ रामा गायकवाड असे नमुद करण्यात आलेले आहे. सदर दस्ताचे अवलोकन केले असता त्यामध्ये काशिनाथ याच्या वडिलांच्या नावामध्ये खाडाखोड झाली असल्याचे दिसुन येते. सदर

दस्तऐवजामध्ये काशिनाथ याची जात व पोट जात हिंदु भिल्ल अशी नमुद करण्यात आलेली आहे. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, वादीने (वा.सा.क्र.१) तिच्या उलटतपासादरम्यान तिची हिंदु कोकणा ही जात असुन हिंदु कोकणा व हिंदु भिल्ल या वेगवेगळया जाती आहेत असे नमुद केलेले आहे. त्यामुळे सदर परिस्थितीमध्ये जनरल रजिस्टर उतारा (निशाणी ३४) यावर प्रतिवादी नं.२ काशिनाथ याची नमुद करण्यात आलेली जात व पोटजात ही वेगळी असल्याने सदर उताऱ्यावर काशिनाथ म्हणजेच प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी नं.२ याचेच नाव आहे किंवा तो कोणी अन्य आहे का याबाबत संशय निर्माण होतो. सदर उताऱ्यावर प्रतिवादी नं.२ याची जन्मतारीख १२.०५.१९८० अशी नमुद केलेली असुन वादीने दाव्यात प्रतिवादी नं.२ याची जन्मतारीख १५.०५.१९८० अशी नमुद केलेली आहे. त्यामुळे देखील सदर जनरल रजिस्टर उतारा हा प्रतिवादी नं.२ काशिनाथ रामा गायकवाड याचाच असल्याबाबत संशय निर्माण होतो.

**१९.** वादीने अभिलेखावर उपविभागीय अधिकारी कळवण यांचा निकाल (निशाणी ३०), अप्पर जिल्हाधिकारी नाशिक यांचे निकालपत्र (निशाणी ३१) व अप्पर आयुक्त नाशिक विभाग यांचे निकालपत्र (निशाणी ३२) दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये मौजे वेरुळे, ता.कळवण येथील फेरफार नोंद क्र. २७५ रद्द केल्याचे दिसुन येते. सदर निकालपत्रांचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिवादी नं.२ काशिनाथ याचा जन्म दि.१५.०५.१९८० साली झालेला असुन मिळकतीचे पुर्वीचे मालक म्हणजेच लक्ष्मण हे दि.१५.०३.१९७७ साली मयत झालेले आहे असे नमुद करण्यात आलेले आहे. सदर निकालपत्रांमध्ये प्रतिवादी नं.२ काशिनाथ याचा जन्म लक्ष्मण हे मयत झाल्यानंतर सुमारे ३ वर्ष व २ महिन्यांच्या कालावधीनंतर झालेला असल्याने प्रतिवादी नं.२ काशिनाथ हा मयत लक्ष्मण बुधा गायकवाड यांचा वारस नसल्याचे दिसुन येत आहे असे नमुद करण्यात आले आहे. सदर निकालपत्रामध्ये निकाल देतांना तहसिलदार, कळवण, उपविभागीय अधिकारी कळवण, अप्पर

जिल्हाधिकारी नाशिक व अप्पर आयुक्त नाशिक यांनी प्रतिवादी नं.२ याच्या शाळेचा जनरल रजिस्टर उतारा (निशाणी ३४) वर त्यांची भिस्त ठेवली असुन त्यानुसार प्रतिवादी नं.२ काशिनाथ याचा दि.१२.०५.१९८० रोजी जन्म झाला आहे असे कथन केलेले आहे. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे शाळेचा सदर जनरल रजिस्टर उतारा (निशाणी ३४) हा वादग्रस्त असल्याचे दिसुन येत असुन वर नमुद केल्याप्रमाणे त्यावर अवलंबुन राहुन काशिनाथ याचा जन्म दि.१२.०५.१९८० रोजी झाला व तो मयत लक्ष्मण यांचा मुलगा नसुन प्रतिवादी नं.१ म्हणजेच सोनीबाई हिने रामा गायकवाड यांच्याशी लग्न केल्यानंतर झालेला त्यांचा मुलगा आहे असे याठिकाणी म्हणता येणार नाही.

**२०.** प्रतिवादी नं.१ सोनीबाई (प्र.वा.सा.क्र.१) हिने तिच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये प्रतिवादी हे दोघे लक्ष्मण यांच्या मृत्युनंतर वेरुळे येथे एकत्र राहत होते, त्यानंतर वादी हिचा विवाह प्रतिवादी नं.१ व २ यांनी रामदास यांच्यासोबत लावुन दिलेला आहे, रामदास यांनी वादीला फुस लावुन सन १९९२ च्या सुमारास प्रतिवादी नं.१ हिच्यावर अनुचित प्रभाव टाकुन स्वतःचे व तिच्या पतीचे नावे वाटप दाखवुन गट नं.९२/१ व ९२/२ हे त्यांच्या नावावर करुन घेतले व गट नं.१० हि मिळकत प्रतिवादी नं.१ च्या नावावर वाटपाने दिली होती असे कथन केलेले आहे. तिने पुढे सदरचे वाटप वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल असल्याने सदर वाटपास प्रतिवादी नं.२ याने कोणतीही हरकत घेतली नाही व सदर वाटपानुसार फेरफार नोंद नं.१८१ मंजुर करण्यात आलेली आहे असे कथन केलेले आहे.

**२१.** वादीने (वा.सा.क्र.१) तिच्या उलटतपासादरम्यान गट क्र.१० चे वाटप हे ती, तिचे पती व सोनीबाई यांच्यामध्ये झाले होते, सदर वाटपासाठी तिच्या पतीने तहसिलदार यांच्याकडे अर्ज दिला होता व त्यानुसार सदरचे वाटप झाले होते असे कथन केलेले आहे. तिने पुढे उलटतपासादरम्यान वाटपाच्या वेळी गट क्र.९२ व १० याच्या महसुलदप्तरी तिचे व सोनीबाई म्हणजेच प्रतिवादी नं.१ हिचे नाव होते व त्यामुळेच त्यांनी वाटप करुन घेतले हे मान्य

केलेले आहे. वादीने अभिलेखावर फेरफार नोंद नं.१७७ (निशाणी २५) दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी व प्रतिवादी नं.१ यांची नावे वारस म्हणुन सोमीबाई यांच्या मृत्युनंतर दावा मिळकत व गट नं.९२ वर लागल्याचे दिसुन येते. प्रतिवादी यांनी अभिलेखावर फेरफार नोंद नं.१८१ (निशाणी ६२) दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये दावा मिळकत, गट नं.९२/१ व ९२/२ चे वाटप वादीने उलटतपासादरम्यान मान्य केल्यानुसार दि.०३.०७.१९९२ रोजी झाले असल्याचे दिसुन येते. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, त्यानंतर सदर दावा मिळकत ही प्रतिवादी यांच्या कब्जात असल्याचे व गट नं.९२ वर वादी व तिच्या पतीचा कब्जा असल्याचे दिसुन येते. वादीने (वा.सा.क्र.१) हिने तिच्या उलटतपासादरम्यान सदर बाब मान्य केलेली आहे.

**२२.** याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, प्रतिवादींच्या कथनानुसार वादीने तिच्या पतीच्या सांगण्यावरुन फेरफार नं.२७५ याबाबत हरकत घेतलेली होती. वादीने (वा.सा.क्र.१) तिच्या उलटतपासादरम्यान सोनीबाई हिने गट क्र.१० काशिनाथच्या नावावर करुन दिला ही गोष्ट तिला मान्य असल्याचे उलटतपासादरम्यान कथन केलेले आहे. तिने पुढे तिच्या पतीच्या सांगण्यावरुन सदर नोंदीविरुध्द तहसिलदार कार्यालयात अर्ज दिला होता व तसेच प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे असे मान्य केलेले आहे. तिने मान्य केलेल्या सदर कथनांवरुन तिला स्वतःला फेरफार नोंद नं.२७५ (निशाणी २६) याबाबत काहीही हरकत नसल्याचे दिसत असुन केवळ पतीच्या सांगण्यावरुन तिने अर्ज व दावा दाखल केलेला आहे. वादीने (वा.सा.क्र.१) प्रस्तुत केसमध्ये कोण साक्षीदार घ्यायचे हे मान्य केलेले असुन तिचे पती सांगतील त्या साक्षीदारांची साक्ष केसमध्ये नोंदविली जाईल हे देखील मान्य केलेले आहे. त्यामुळे वादीला प्रस्तुत दाव्याबद्दल स्वतः काहीही माहिती नसल्याचे दिसुन येत असुन तिच्या पतीच्या सांगण्यावरुन तिने प्रस्तुतचा दावा दाखल केला असल्याने तिच्या कथनांवर विश्वास ठेवता येणार नाही.

**२३.** वर नमुद चर्चेअंती हे सिध्द होत आहे की, प्रतिवादी नं.१ व २ यांचा फेरफार क्र.२७५ (निशाणी २६) नुसार सदर दावा मिळकतीवर कब्जा असुन त्यामध्ये वादीचा काहीही संबंध नाही. त्यामुळे दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा काहीही हक्क व अधिकार राहिलेला नाही हे सिध्द होत नाही. त्यामुळे वादी ही सदर दावा मिळकतीची मालक आहे तसेच प्रतिवादी यांचा दावा मिळकतीवरील कब्जा हा बेकायदेशीर आहे हे सिध्द झालेले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष **नकारार्थी** नांदवित आहे.

**मुद्दा क्र.३ व ४ करिता**

**२४.** वर नमुद चर्चेअंती वादी ही दावा मिळकतीची एकमेव मालक नसल्याने व प्रतिवादींचा दावा मिळकतीवरील कब्जा हा बेकायदेशीर नसल्याने वादी ही दावा मिळकतीचा कब्जा मिळण्यास पात्र नाही. वादीने (वा.सा.क्र.१) तिच्या उलटतपासादरम्यान प्रतिवादींची जमिन विकत घेण्यासाठी व पाहण्यासाठी आजरोजीपर्यंत कोणीही आलेले नाही हे मान्य केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ हया प्रतिवादी नं.२ यांच्या सांगण्यावरुन दावा मिळकत त्रयस्त इसमांच्या लाभात विक्री करण्याच्या तयारीत आहेत असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादी यांनी दाव्यात मागणी केल्याप्रमाणे निरंतर ताकिदीचा हुकुम मिळण्यास पात्र नाही. सबब मी मुद्दा क्र.३ व ४ चा निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करिता**

**२५.** वर नमुद चर्चेअंती वादी हे दाव्यात मागणी केल्याप्रमाणे कोणतीही मागणी मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे दावा खारीज होण्यास पात्र आहे. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींना आजपर्यंत चालविण्यास भाग पाडले असल्याने वादीने प्रतिवादींना प्रस्तुत दाव्याचा खर्च देणे आवश्यक असुन तिने स्वतः दाव्याचा खर्च सोसणे गरजेचे आहे. त्यामुळे, मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षाअंती खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. दावा नामंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तुत दाव्याचा खर्च स्वतः सोसावा व प्रतिवादींना त्यांचा खर्च द्यावा.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN

Digitally signed by VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN
Date: 2026.04.28 17:28:28 +0530

कळवण.
दि.२८/०४/२०२६

**(विश्वजीत.बी.चव्हाण)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळवण.